डिजिटल साक्षर मिशन - दहा लाख

पहा, शिका आणि प्रगत व्हा

आज कोविड -१९ च्या जागतिक साथीमुळे शैक्षणिक संस्था बंद ठेवणाऱ्या राज्यांची, इलाख्यांची आणि संपूर्ण देशांचीही संख्या वाढत असल्याने जगातील ८०% हूनही अधिक विद्यार्थी शाळेला जात नाही आहेत (संदर्भ : युनेस्को,२०२०). या घडीला शिक्षणाचे दरवाजे प्रत्येकासाठी उघडे राहावेत म्हणून प्रथम इन्फोटेक फाउंडेशन आपले या क्षेत्रातील नैपुण्य आणि संसाधने सर्वांसाठी खुली करण्यासाठी सज्ज झाले आहे. प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे सहसंस्थापक आणि सीईओ श्री.प्रेम यादव म्हणतात, "डिजिटल लर्निंगच्या माध्यमातून लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणावे अशी आमची इच्छा आहे. कोविड -१९ च्या उद्रेकाचा परिणाम विद्यार्थ्यांवर, तरुणांवर किंवा कोणत्याही व्यक्तीवर कमीत कमी व्हावा असा या मागचा आमचा हेतू आहे. या दृष्टीने आपल्याला डिजिटल साक्षर ॲपचे लक्षणीय सहकार्य मिळू शकेल.

प्रथम इन्फोटेक फाउंडेशनच्या इ-एज्युकेशनच्या क्षेत्रातील अनेक वर्षांच्या अनुभवातून आम्ही एक विनाशुल्क ऑनलाईन लर्निंग ॲप सुरु केले आहे. डिजिटल साक्षर या आमच्या साइट वर अनेक उत्तम अभ्यासक्रम विनाशुल्क उपलब्ध आहेत. यात 100 हून अधिक अभ्यासक्रम आणि ५०००+ व्हिडीओ असून त्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे: शैक्षणिक - पायभूत कौशल्ये, व्यवसाय-रोजगारासाठीची कौशल्ये व सॉफ्ट स्किल्स, तांत्रिक - डिजिटल आणि कोडिंगची कौशल्ये, डिझायनिंग ग्राफिक्स आणि ॲनिमेशनची कौशल्ये. याखेरीज महाराष्ट्राच्या एस.एस.सी बोर्डाचा अभ्यासक्रम त्याचे ठोस आकलन व्हावे यासाठी डिजिटल साक्षर प्लॅटफॉर्मवर डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आला आहे.

संपूर्ण भारतभरात डिजिटल साक्षर ॲपच्या माध्यमातून पुढील दोन महिन्यांच्या कालावधीत समाजातील 2 लाख सदस्यांपर्यंत पोहोचण्याचे प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे ध्येय आहे. या सदस्यांत माता पालक, विद्यार्थी व तरुणवर्गाचा समावेश असेल. वयवर्षे 3 ते 50 ह्या वयोगटातील व्यक्तीसाठी अभ्यासक्रमांची आखणी करण्यात आली असून त्यात विद्यार्थ्यांसाठी पायाभूत कौशल्यांवर आणि तरुणवर्ग व माता पालकांसाठी डिजिटल कौशल्यांवर भर देण्यात आला आहे.

ह्या सर्व अभ्याससामग्रीची विभागणी पाच श्रेणीमध्ये करण्यात आली आहे.

- वयोगट 3 ते 5 वर्षे : यात श्रवण आणि संभाषणाच्या कौशल्यावर लक्ष केंद्रित करणारी अभ्याससामग्री आहे.
- वयोगट 6 ते 10 वर्षे : हसत खेळत संभाषणात्मक इंग्रजीचे शिक्षण.
- वयोगट 11 ते 18 वर्षे : संगणक विज्ञानाच्या मुलभूत गोष्टींचे आकलन.
- वयोगट 18 ते 50 वर्षे : रोजगारासाठी आवश्यक गोष्टींत प्राविण्य मिळविण्यासाठी डिजिटल कौशल्ये आणि व्यक्तिमत्व विकासासाठी सॉफ्ट स्किल्स.
- वयोगट 21 + (माता पालक) : दैनंदिन जीवनासाठी आणि मुलांना डिजिटल लर्निंगमध्ये मदत करण्यासाठी आवश्यक डिजिटल कौशल्ये.

An Initiative by Pratham InfoTech Foundation

समाजातील मोबिलायझेशन : ह्यात शाळकरी मुले, त्यांचे पालक व तरुणवर्गाचा समावेश करायचा आहे. ज्या शाळा शिक्षकांकडे पालकांचे व्हॉटस् ॲप ग्रुप्स असतील असे शिक्षकही ह्या उपक्रमात सहभागी करून घ्यायचे आहेत. सरपंच, नगरसेवक, आमदार अशा स्थानिक नेत्यांना भेटून त्यांना डिजिटल साक्षरचे महत्व समजावून सांगायचे आहे. सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळण्यासाठी आणि सुरक्षित राहण्यासाठी व्हॉटस् ॲप मेसेजच्या माध्यमातून मोबिलायझेशन घडवून आणायचे आहे.

अभ्यासक्रमाच्या बॅचसाठीचे लक्ष्य - सर्व लाभार्थींच्या अभ्यासक्रमांचा कालावधी 6 ते 10 दिवसांच्या दरम्यान ठरविण्यात आला आहे. प्रत्येक टीम मेंबरने 2 महिन्यांच्या ह्या कालावधीत समाजातील 200 व्यक्तींना डिजिटल साक्षर अभ्यासक्रमासाठी प्रेरित करायचे आहे. दर महिन्याला 3 बॅचेस घ्यायच्या आहेत. प्रत्येक बॅचमध्ये समाजातील 30 ते 35 सदस्यांचा समावेश असावा. विद्यार्थी, तरुणवर्ग व पालक ह्या श्रेणीनुसार व्हॉटस् ॲप ग्रुप बनविण्यात येतील. लाभार्थींचे आवश्यक ते तपशील, त्यांची उपस्थिती आणि त्यांचा अभिप्राय इत्यादी माहिती गोळा करण्यासाठी एक ऑनलाईन रजिस्ट्रेशन लिंक निर्माण केली जाईल.

कालावधी: मे **20 - फेब्रुवारी २०२०** (**10** महिने)

पाठ नियोजन : पाठाचे नियोजन 3 ते 5 मिनिटांच्या व्हिडियोमध्ये करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी स्वत: करावयाच्या उपक्रमांसाठीच्या मार्गदर्शक सूचनांसह ते व्हिडियो व्हॉटस् ॲप ग्रुपवर रोजच्या रोज पाठवण्यात येतील. ह्या बॅचेस चालवण्यासाठी प्रथम इन्फोटेक फाउंडेशनच्या टीम मेंबरची नेमणूक केली जाईल. हे टीम मेंबर लाभार्थींना पाठनियोजनाच्या आकलनासाठी आणि त्यांना दिलेले काम पुरे करण्यासाठी मदत करतील.

प्रमाणपत्र: अभ्यासक्रम यशस्वी रीतीने पूर्ण केल्यावर ऑनलाईन मुल्यांकन केले जाईल आणि प्रमाणपत्र दिले जाईल.

ह्या लॉकडाउनच्या काळात लॉक घरात बसून असताना डिजिटल साक्षर सारख्या उपक्रमामुळे त्यांच्या कौशल्यांमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी हातभार लागेल असा प्रथम इन्फोटेक फाउंडेशनला विश्वास वाटतो. समाजातील डिजिटल भरून काढण्यास, शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्यास आणि वंचित गटातील तरुणांना नवीन अर्थव्यवस्थेत आवश्यक असलेल्या 21 व्या शतकातील कौशल्यांत तयार करण्यास या गोष्टीची मदतच होईल.